महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांकः नाविमं / पमा / 2739
नागपूर, दिनांक :- 08 / 08 / 2023

प्रति,
मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क अधिकारी,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

विषयः- सन 2024 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या नांवनोंदणी अर्जाबाबत.
संदर्भ:- 1. राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र कमांक रा.मं. / परीक्षा-3 / 3466 दि. 08 / 08 / 2023.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, फेब्रुवारी / मार्च- 2024 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या नांवनोंदणी अर्ज (फॉर्म नं.17) ऑनलाईन प्रकीयेव्दारे भरण्यासंदर्भातील प्रकटन या पत्रासोबत जोडण्यात आले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्यांचे वेळी विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी. ही विनंती

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

सहपत्रः-प्रकटनाची प्रत

1) प्रति, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे-4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) प्रति, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) प्रति, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून द्यावे.
4) प्रति, मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) प्रति, मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै.......................................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक / प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## * प्रकटन *

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) वं उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी (इ. १०वी) खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सध्या संपर्क केंद्रामार्फत नावनोंदणी प्रक्रिया राबविण्यात येते. यामध्ये संपर्क केंद्रामार्फत सर्व कार्यवाही राबविण्यात येत होती. मात्र प्रचलित पध्दतीमधील अडचणींचा, त्रुटींचा विचार करुन सदरची योजना जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभदायी, सुलभ व विद्यार्थी केंद्रीत व्हावी या दृष्टीने सध्याची संपर्क केंद्र शाळेमार्फत नाव नोंदणी अर्ज स्विकारण्याची प्रचलित पध्दत बंद करुन इ. १२वी च्या विद्यार्थ्यांचे ज्या पध्दतीने सर्व कनिष्ठ महाविद्यालयांतून नाव नोंदणी अंर्ज स्विकारण्यात येतात त्याप्रमाणेच माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १०वी) च्या खाजगी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळांमधून स्विकारण्याची कार्यपध्दती मार्च २०२४ च्या परीक्षेपासून सुरु करण्यात येत आहे.

तरी सर्व माध्यमिक शाळांनी याची नोंद घेऊन शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या परंतु किमान इ. ५ वी उत्तीर्ण असलेल्या मुला–मुलींना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस बसून शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या संकेतस्थळावर http://mahahsscboard.in प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच अधिक माहितीसाठी सर्व माध्यमिक शाळांनी आपल्या कार्यकक्षेतील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

त्यानुसार फेब्रुवारी – मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस खाजगीरित्या (फॉर्म नं.१७) प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेव्दारे भरुन घेण्यात येणार असून त्यासाठी खाली नमूद केलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावयाची आहे.

(कृ.मा.प)

इ.१०वी व इ.१२वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र. | तपशील | इ.१२ वी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | इ.१० वी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरणे. | गुरुवार दि. १० ऑगस्ट २०२३ ते सोमवार दि. ११ सप्टेंबर २०२३ | सोमवार दि. १४ ऑगस्ट २०२३ ते सोमवार दि. ११ सप्टेंबर २०२३ |
| २ | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळेत / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करणे. | शनिवार दि. १२ ऑगस्ट २०२३ ते बुधवार दि. १३ सप्टेंबर २०२३ | गुरुवार दि.१७ ऑगस्ट २०२३ ते बुधवार दि. १३ सप्टेंबर २०२३ |
| ३ | माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज,ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची एक छायाप्रत, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. | शुक्रवार दि. १५सप्टेंबर २०२३ | शुक्रवार दि.१५सप्टेंबर २०२३ |

१. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१०वी व इ.१२वी साठी नाव नोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी / इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

**संकेतस्थळ–** इ.१० वी – http://form17.mh-ssc.ac.in
इ.१२ वी – http://form17.mh-hsc.ac.in.

३. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता १)शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीय प्रत व प्रतिज्ञापत्र २)आधारकार्ड ३)स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.